नि. फौ. ख. क्र.९३/२०२०                                   निशाणी क्र.११

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

नाव – राजेश शालीग्राम वैतकार

वय – ५० वर्षे,                          व्यवसाय – शेतीकाम

पत्ता – रा. गोरेगाव बु. ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दि.१३.०५.२०२० रोजी मी माझ्या घरी गोरेगाव बु. या ठिकाणी होतो. त्या दिवशी सुमारे दुपारी ३ वा. सुमारास माझ्या घराच्या शेजारी असलेल्या गाईच्या गोठ्याच्या वाडग्यामध्ये रवी आगरकर हा दारु पिलेल्या अवस्थेमध्ये आला व मला म्हणाला की, त्याच्या विरुध्द मी पो.स्टे. येथे दाखल केलेली सन २०१६–१७ च्या दरम्यान सोयाबीन व कापूस चोरीची केस पाठीमागे घेण्यास म्हणाला. मी त्यास म्हणालो की, मी केस मागे घेत नाही. त्यावर त्यानी मला त्याच्या हातात असलेल्या स्टीलचा दारु पिण्याचा ग्लासने माझ्या तोंडावर, नाकावर व पाठीवर मारहाण केली. सदरची मारहाण सुरु असताना रवि आगरकर याच्या वडीलांनी त्यास आवरले. सदर मारहाणीमध्ये माझ्या नाकाला, तोंडावर, छातीवर दुखापत झाली होती. त्यानंतर मी सदर भांडणाची फिर्याद बाळापूर पो.स्टे. येथे रवि आगरकर याच्या विरुध्द दिली. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येत आहे. तसेच आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१३** देण्यात येत आहे.

२. मी पो.स्टे. येथे फिर्याद देण्याकरीता गेलो त्यावेळी पोलीसांनी मला ग्रामीण रुग्णालय येथे उपचाराकरीता पाठविले. सदर घटनेची चौकशी करण्याकरीता पोलीस आमच्या गावी आले होते, त्यावेळी मी त्यांना घटनास्थळ दाखविले. मला रवी आगरकरने ज्या ग्लासने मारहाण केली तो ग्लास पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता न्यायालयासमोर

स्टीलचा ग्लास त्याच्या भोवताली कागदी लेबल लावले त्यावर दोन पंचांच्या सह्या असलेले दाखविण्यात आले. सदरचाा ग्लास तोच आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येत आहे. मी आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो, तो आज न्यायालयात हजर नाही. आरोपीच्या ओळखीबाबत त्याच्या वकीलांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांचे मार्फत उलटतपास सुरुः</u>**

३. मी माझा जबाब पोलीसांना देतेवेळेस "त्याच्या विरुध्द मी पो.स्टे. येथे दाखल केलेली सन २०१६–१७ च्या दरम्यान सोयाबीन व कापूस चोरीची केस पाठीमागे घेण्यास म्हणाला'' हा मजकूर पोलीसांना सांगितला होता, पोलीसांनी माझ्या जबाबात का नमुद केला नाही, याचे कारण मला माहित नाही.

४. माझ्या गावातून बाळापूर पो.स्टे. येथे येण्यास १ तास अवधी लागतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेच्या पुर्वी माझे व आरोपीचे भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला दारु पिण्याचे व्यसन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दारु पिण्याचे व्यसन असल्याने मी दारु पिवून पडलो व मला जखम झाली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्यामध्ये जुने वाद असल्याकारणाने मी आरोपी विरुध्द खोटा रिपोर्ट दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस मला बाळापूर येथील पो.स्टे. येथे भेटल्यानंतर ते पुन्हा मला कधीच भेटले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ कडील ग्लास हा आमच्या प्रत्येकाच्या घरी उपलब्ध असतो. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ कडील ग्लास मी पोलीसांना दिला होता. सदर ग्लासवर राजाराम चिंचोळकर असे नाव लिहीलेले आहे, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द जाणीव पुर्वक, विचार करुन फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

दिनांकः– २७.०६.२०२५

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.06.30 10:57:39 +0530

(दयानंद एम. वाघमारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), बाळापूर.

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. दयानंद एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २७/०६/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २७/०६/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ३०/०६/२०२५ |